


# पारनेर दर्शन




वर्ष ४ अंक ११६, बुधवार १ जुलै २०२६ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## पारनेर कारखाना विक्रीप्रकरणी न्यायालयाचा 'वॉच'

### तपासावर आता थेट देखरेख | दर पंधरा दिवसांनी तपासाचा अहवाल सादर करण्याचे आदेश | आदेश न पाळल्यास न्यायालयाच्या अवमानाची कारवाई होणार

**पारनेर : प्रतिनिधी**

**देवीभोयरे येथील पारनेर सहकारी साखर कारखान्याच्या कथित विक्री घोटाळ्याप्रकरणी दाखल गुन्ह्याच्या तपासातील संथ गतीवर नाराजी व्यक्त करत पारनेर प्रथम वर्ग न्यायालयाने अत्यंत महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास न्यायालयाच्या थेट निगराणीत होणार असून, तपासाची प्रत्येक टप्प्यावरील माहिती न्यायालयाला नियमित सादर करण्याचे आदेश प्रथम वर्ग न्यायाधीश मुबीन शेख यांनी सोमवारी दिले. त्यामुळे या बहुचर्चित प्रकरणाच्या तपासाला नवे वळण मिळाले आहे.**

कारखाना बचाव समितीने दाखल केलेल्या अर्जावर सुनावणी करताना न्यायालयाने तपासातील विलंब, आरोपींविरोधात अपेक्षित कारवाई न होणे, महत्त्वाच्या पुराव्यांचा अभाव आणि तपासातील निष्क्रियता याची गंभीर दखल घेत पोलिसांकडून आतापर्यंत झालेल्या तपासाचा सविस्तर अहवाल मागवला आहे. यापुढे दर पंधरा दिवसांनी तपासातील प्रगतीचा अहवाल न्यायालयात सादर करणेही पोलिसांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे.



#### न्यायालयाचा कडक इशारा

सुनावणीनंतर न्यायालयाने या प्रकरणातील तपासावर स्वतः देखरेख ठेवण्याचा निर्णय घेतला. तपासाचा अहवाल दर पंधरा दिवसांनी न्यायालयात सादर करण्याचे आदेश देतानाच, या आदेशाचे पालन करण्यात कसूर झाल्यास संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना न्यायालयाच्या अवमानाच्या कारवाईला सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशाराही आदेशात देण्यात आला आहे.

#### ४२ साक्षीदारांचे जबाब प्रलंबित

फिर्यादींनी तपासासाठी ४२ महत्त्वाच्या साक्षीदारांची नावे पोलिसांना दिली होती. मात्र, दीड वर्ष उलटूनही या साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आलेले नसल्याचे न्यायालयात सांगण्यात आले. तपासातील ही मोठी त्रुटी असल्याचे समितीचे म्हणणे आहे.

#### तपास अधिकाऱ्याची बदलीही चर्चेत

या प्रकरणाचे तत्कालीन तपासी अधिकारी, पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांची मुदतपूर्व बदली राजकीय हस्तक्षेपातून करण्यात आल्याचा आरोपही अर्जात करण्यात आला. त्यामुळे तपासाची दिशा बदलली आणि तपासाची गती मंदावल्याचा दावा कारखाना बचाव समितीने केला.

#### यांनी मांडली फिर्यादींची बाजू

कारखाना बचाव समितीच्या वतीने ॲड. रामदास घावटे आणि ॲड. उन्मेश चौधरी यांनी न्यायालयात सविस्तर युक्तिवाद केला. तपासातील त्रुटी, विलंब आणि पुराव्यांबाबत न्यायालयाचे लक्ष वेधत तपासावर न्यायालयीन देखरेख ठेवण्याची मागणी त्यांनी केली.

#### दीड वर्ष उलटले, तपासात प्रगती नाही

या प्रकरणात वर्षभरापूर्वी पारनेर न्यायालयाने राज्य सहकारी बँकेचे दोन अधिकारी, क्रांती शुगर कंपनीचे नऊ संचालक आणि देवीभोयरेचे तत्कालीन तलाठी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला; मात्र त्यानंतर तब्बल दीड वर्षाचा कालावधी लोटूनही तपासात कोणतीही लक्षणीय प्रगती झालेली नसल्याचा मुद्दा कारखाना बचाव समितीने न्यायालयासमोर मांडला. अहमदनगर सत्र न्यायालयाने संबंधित आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले असतानाही त्यांना अटक करण्यात आलेली नसल्याचेही समितीने निदर्शनास आणून दिले. त्यामुळे तपासाच्या निष्पक्षतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचा दावा करण्यात आला.

#### दीडशे कोटींच्या मुद्देमालाचा मागमूस नाही

गुन्हा दाखल झाल्यानंतर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सुमारे दीडशे कोटी रुपयांच्या किमतीचा मुद्देमाल गायब झाल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे. याबाबत पारनेर पोलिसांनी पंचनामा केला असला, तरी तो मुद्देमाल अद्याप हस्तगत करण्यात आलेला नाही. तपासातील ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे समितीने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

#### मूळ कागदपत्रांमध्ये फेरफाराचा प्रयत्न

कारखाना विक्रीशी संबंधित सरकारी अभिलेखांमध्ये फेरफार करण्याचाही प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला. फिर्यादीच्या तक्रारीनंतर पारनेर तहसीलदारांनी संबंधित मूळ दप्तर जप्त करून रेकॉर्ड रूममध्ये सुरक्षित ठेवले आहे. त्यामुळे महत्त्वाचे दस्तऐवज सुरक्षित राहिल्याचे समितीने सांगितले.

#### शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या

न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे आता या प्रकरणाचा तपास पूर्णपणे पारदर्शक आणि निःपक्षपणे होईल, असा विश्वास सुमारे १७ हजार पीडित शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला आहे, अशी प्रतिक्रिया कारखाना बचाव समितीचे सदस्य बबनराव कवाद आणि साहेबराव मोरे यांनी व्यक्त केली.

#### न्यायालयीन इतिहासातील दुर्मीळ निर्णय

पारनेर तालुक्याच्या न्यायालयीन इतिहासात एखाद्या फौजदारी गुन्ह्याच्या तपासावर न्यायालयाने स्वतः देखरेख ठेवणे, तपासाचा नियमित आढावा घेणे आणि प्रगती अहवाल मागविण्याची घटना प्रथमच घडत असल्याचा दावा कारखाना बचाव समितीने केला आहे. त्यामुळे या आदेशाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून, पुढील तपासाची दिशा आणि त्यातून होणाऱ्या कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## टाकळी ढोकेश्वर आरोग्य केंद्राचे नूतनीकरण करा

### आ. काशिनाथ दाते यांची विधानसभेत मागणी | सरसकट कर्जमाफीकडेही वेधले लक्ष | पुरवणी मागण्यांवरील चर्चेत शेतकरी, पशुपालक आणि ग्रामीण आरोग्याचे प्रश्न

**पारनेर : प्रतिनिधी**

राज्याच्या पावसाळी अधिवेशनात २०२६-२७ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरू असताना आमदार काशिनाथ दाते यांनी शेतकरी, पशुपालक आणि ग्रामीण आरोग्याशी संबंधित मुद्दे थेट सभागृहात मांडले. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, पशुवैद्यकीय दवाखान्यांमधली रिक्त पदे भरावीत, प्रत्येक ग्रामपंचायतीत हवामान केंद्र उभारावीत आणि टाकळी ढोकेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्राचं तातडीने नूतनीकरण करावं, अशी मागणी त्यांनी केली.



#### सरसकट कर्जमाफीची मागणी

राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीच्या निर्णयाचं त्यांनी स्वागत केलं आणि मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच सहकारमंत्र्यांचं अभिनंदनही केलं. पण याआधी कर्जमाफीचा फायदा घेतलेल्या शेतकऱ्यांना यावेळी फक्त ५० हजारांचं प्रोत्साहनपर अनुदान देण्याच्या निर्णयावर शेतकऱ्यांमध्ये नाराजी असल्याचं त्यांनी सांगितलं. त्यामुळे राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी त्यांची मागणी होती.

#### पशुवैद्यकीय रिक्त पदे भरण्याची मागणी

पशुसंवर्धन विभागावरील चर्चेत दुधाळ गायी-म्हैस पालन, शेळीपालन आणि कुक्कुटपालन यांसारखे जोडधंदे आर्थिकदृष्ट्या कमकुवत शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवू शकतात, असं दाते यांनी सांगितलं. पण या योजनांचा फायदा प्रत्यक्ष गरजू लोकांपर्यंत पोहोचायला हवा, यावर त्यांनी भर दिला. जिल्हा परिषदेकडून राज्य शासनाकडे आलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची मोठी कमतरता असल्याने ग्रामीण भागातील पशुपालकांना अडचणी येत असल्याचं त्यांनी सभागृहात मांडलं. पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी याकडे तातडीने लक्ष देऊन रिक्त पदे भरावीत, अशी मागणी त्यांनी केली.

#### लोकहिताच्या प्रश्नांवर ठाम भूमिका

पुरवणी मागण्यांवरील चर्चेत आ. काशिनाथ दाते यांनी मांडलेल्या मुद्द्यांमधून पारनेर मतदारसंघापुरतेच नाही, तर राज्यभरातील शेतकरी, पशुपालक आणि ग्रामीण जनतेचे प्रश्न त्यांनी ठळकपणे मांडले. विकास, न्याय्य लाभ आणि ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा यांना प्राधान्य देणारे निर्णय सरकारने घ्यावेत, यासाठी त्यांनी घेतलेली भूमिका लक्षवेधी ठरली.

#### प्रत्येक ग्रामपंचायतीत हवामान केंद्र

कृषी विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलताना प्रत्येक ग्रामपंचायतीत स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्याच्या निर्णयाचं त्यांनी स्वागत केलं. यामुळे पावसाची नोंद अधिक अचूक होईल, असं ते म्हणाले. आधी मंडळ स्तरावरच्या एका पर्जन्यमापकावरच अवलंबून राहावं लागत होतं, त्यामुळे अनेक गावांवर अन्याय होत होता, असंही त्यांनी नमूद केलं. अवर्षण आणि अतिवृष्टीग्रस्त भागांना या योजनेत आधी प्राधान्य द्यावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ठिबक सिंचन, कृषी यांत्रिकीकरण आणि इतर योजनांचा फायदा खऱ्या अर्थाने पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचायला हवा, असंही ते म्हणाले.

#### आरोग्य केंद्राच्या नूतनीकरणाची गरज

सार्वजनिक आरोग्य विभागावरील चर्चेत त्यांनी टाकळी ढोकेश्वरच्या प्राथमिक आरोग्य केंद्राची सध्याची अवस्था सभागृहात मांडली. साधारण २० ते २५ वर्षांपूर्वी बांधलेल्या या इमारतीत आजही अनेक मूलभूत सुविधा नाहीत, त्यामुळे गावकऱ्यांना उपचारासाठी खूप त्रास सहन करावा लागत असल्याचं त्यांनी सांगितलं. त्यामुळे या आरोग्य केंद्राचं तातडीने नूतनीकरण करून आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्यांनी शासनाकडे केली.

## शॉक लागून दोन दुभत्या म्हशींचा मृत्यू

### अनधिकृत वीजजोडणीचा घात

**नगर : प्रतिनिधी**

**भिंगारजवळील बाराबाभळी शिवारात अनधिकृत वीजजोडणीमुळे विजेचा तीव्र शॉक बसून दोन दुभत्या म्हशींचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी (दि. २९) दुपारी चारच्या सुमारास घडली. या घटनेमुळे दूध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याप्रकरणी नीलेश सतीश आहेरगवळी (वय ४०, रा. बाराबाभळी, ता. नगर) यांनी कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आहेरगवळी हे दूध व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सोमवारी दुपारी



त्यांच्या दुभत्या म्हशी नेहमीप्रमाणे बाराबाभळी शिवारातील म्हशानखाणी परिसरात चरण्यासाठी सोडण्यात आल्या होत्या. याच ठिकाणी सार्वजनिक हायमॅक्स वीजखांब उभारलेला आहे.

फिर्यादीनुसार, गावातील अशोक कराळे आणि आबा कराळे यांनी सार्वजनिक वीजखांबावरून अनधिकृतपणे वीजेचा आकडा

उर्वरीत पान ३ वर

## भोयरे गांगर्डा येथे घरफोडी

### कुलूप तोडून ८५ हजारांचा ऐवज लंपास

**सुपा : प्रतिनिधी**

**तालुक्यातील भोयरे गांगर्डा येथे बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी ८५ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, सुपा पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भोयरे गांगर्डा येथील रहिवासी निवृत्ती गोपीनाथ पवार (वय ६३) यांच्या घरी ही चोरी झाली. २८ जून रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते २९ जून रोजी पहाटे ५.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटाची उचकापाचक करून त्यामध्ये ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम असा एकूण ८५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

सकाळी घर उघडल्यानंतर दरवाज्याचे कुलूप तुटलेले आणि घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले. कपाटातील दागिने व रोख

उर्वरीत पान ३ वर

## भरधाव डंपरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

### स्पीड ब्रेकरवर वेग ठरला जीवघेणा केडगाव बायपास चौकाजवळील दुर्घटना

**नगर : प्रतिनिधी**

**नगरपुणे महामार्गावरील केडगाव बायपास चौकाजवळ नील हॉटेलसमोरील स्पीड ब्रेकरवर भरधाव डंपरने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील महिला जागीच ठार झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. या अपघातात कांचन उर्फ अरमीना अरबाज चौगुले (रा. बालाजी कॉलनी, शाहूनगर,**




**केडगाव) यांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

उर्वरीत पान ३ वर

## कोयता-तलवारीसह दहशत माजविणाऱ्याला अटक

### केडगावात कोतवाली पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**केडगाव परिसरात धारदार कोयता आणि तलवार जवळ बाळगून नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या एका तरुणाला कोतवाली पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने शिताफीने पकडले. आरोपीकडून एक तलवार आणि लोखंडी कोयता जप्त करण्यात आला असून त्याच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव सोमनाथ राजेंद्र गंगतीरे (वय २७, रा. समतानगर, देवी मंदिरामागे, केडगाव) असे आहे. कोतवाली पोलिस ठाण्याचे गुन्हे शोध पथक २९ जून रोजी वटसावित्री पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर केडगाव परिसरात गस्त घालत होते. दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांना माहिती




मिळाली की, समतानगर परिसरात एक तरुण हातात तलवार घेऊन फिरत असून परिसरात दहशत निर्माण करीत आहे. त्यांनी तातडीने कारवाईचे आदेश दिल्यानंतर पोलिस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांनी गुन्हे शोध पथकाला घटनास्थळी रवाना केले.

पथकाने घटनास्थळी पोहोचताच संशयित सोमनाथ गंगतीरे याला शिताफीने ताब्यात घेतले. त्यानंतर त्याच्या घराच्या बाहेरील परिसराची

उर्वरीत पान ३ वर

## दिव्यांग प्रतीक लांडे बनला राज्यकर सहाय्यक आयुक्त

### खंडाळेच्या जिद्दी युवकाची एमपीएससीमध्ये घवघवीत भरारी | मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार | रांजणगाव-खंडाळे परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव

**शिरूर : प्रतिनिधी**

**आई-वडिलांची परिस्थिती अत्यंत बेताची, थोडीफार जिरायती शेती आणि वडिलांचा भाजीपाल्याचा व्यवसाय. लहानपणापासूनच घरातील संघर्ष व कष्ट पाहत त्याने मोठी स्वप्ने उराशी बाळगली. दिव्यांगत्वावर मात करत अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर त्याने राज्यकर सहाय्यक आयुक्त (श्रेणी-१) या प्रतिष्ठेच्या पदाला गवसणी घातली. खंडाळे (ता. शिरूर) येथील दिव्यांग युवक प्रतीक नवनाथ लांडे यांचा हा प्रेरणादायी प्रवास आजच्या तरुणाईसाठी निश्चितच आदर्श ठरणारा आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.**

विशेष म्हणजे, यापूर्वी प्रतीक यांची

उर्वरीत पान ३ वर




#### शिक्षकांचे मार्गदर्शन ठरले यशाची गुरुकिल्ली

लहानपणापासूनच शाळेतील शिक्षकांनी त्यांच्यातील विविध गुण ओळखले. त्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवत शिक्षकांनी सातत्याने मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि मदत केली. याच प्रेरणेतून प्रतीक यांचा आत्मविश्वास अधिक बळकट होत गेला आणि त्यांनी स्पर्धा परीक्षेच्या क्षेत्रात यशाचे शिखर गाठले. त्यांच्या एमपीएससीमधील या यशामुळे रांजणगाव गणपती आणि खंडाळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध क्षेत्रांतील मान्यवर, ग्रामस्थ, मित्रपरिवार आणि नातेवाईकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

#### ...पण जिद्द कधीच सोडली नाही

''माझ्या मामांनी अत्यंत बिकट परिस्थितीतही मला मोठा आधार दिला. दिव्यांगत्वामुळे काही वेळा स्वतःबद्दल न्यूनगंड निर्माण व्हायचा आणि आत्मविश्वासही ढासळायचा. मात्र, जिद्द कधीच सोडली नाही. आई-वडिलांचे कष्ट पाहून पुन्हा नव्या उमेदीनं उभा राहिलो. परिस्थितीचा कधीही बाऊ केला नाही. पैसे नाहीत म्हणून रडत किंवा खचून बसलो नाही. कोणत्याही कोचिंग क्लासशिवाय स्पर्धा परीक्षेची तयारी केली आणि अखेर यश मिळवले. यापूर्वी दुय्यम निबंधक, राज्यकर निरीक्षक आणि तलाठी या तिन्ही परीक्षांमध्ये एकाच वेळी यश मिळवले होते. आता राज्यकर सहाय्यक आयुक्त म्हणून निवड झाल्याने हा माझ्या आयुष्यातील दुग्धशर्करा योगच आहे.''

प्रतीक नवनाथ लांडे

# प्रगतीमंत्र

# नाही टिकणार ग्राफिक डिझायनर्स?

## या युगात कोण वाचवेल स्वतःची नोकरी अन् कशी ?



आज, कोणीही फक्त काही शब्द टाइप करून आश्चर्यकारक डिझाइन तयार करू शकतो. फोटो तयार करणे, मजकूर संपादित करणे किंवा जटिल इन्फोग्राफिक्स तयार करणे... सर्वकाही काही मिनिटांत करता येते. तुम्हाला फक्त तुमचा प्रॉम्प्ट एआय टूलवर लिहायचा आहे. ग्राफिक डिझायनर्स वर्षानुवर्षे ही सर्व कामे करत आहेत. वर्तमानपत्रे, वृत्तवाहिन्या, वेबसाइट्स आणि मासिकांसह अनेक ठिकाणी समर्पित ग्राफिक डिझायनर पोस्ट आहेत. पण आता कृत्रिम बुद्धिमत्ता हेच काम करत असल्याने ग्राफिक डिझायनर्सची गरज नाहीशी होईल का ? नाही. पण नवीन आव्हाने निश्चितच समोर येत आहेत. जुना पॅटर्न चालणार नाही. एआय ग्राफिक डिझाइन कसे बदलत आहे ते जाणून घ्या...

### एआय डिझाइन प्रक्रिया कशी बदलतेय ?

एआय टूल्स डिझाइनच्या प्रत्येक टप्प्याला सोपे करत आहेत. सुरुवातीच्या कल्पनांपासून ते अंतिम उद्दिष्टापर्यंत हे टूल्स पुनरावृत्ती होणारी कामे स्वयंचलित करतात. याचा थेट फायदा असा आहे की ग्राफिक डिझायनर्स त्वरीत कामे करू शकतात. क्लायंटना वेळेवर सेवा देऊ शकतात आणि संपूर्ण कामाची गुणवत्ताही सुधारू शकतात.

### एआयचा प्रभाव

- AI मुळे ग्राफिक डिझायनर्स अनेक पुनरावृत्ती होणारी कामे जलद करू शकतात. जसे, की...
- DALL.E आणि Midjourney सारखे टूल्स काही शब्दांत दृश्य संकल्पना निर्माण करतात.
- Photoshop मधील जनरेटिव्ह फिलने इमेजचे भाग बदलणे किंवा नवीन घटक जोडणे सोपे करते.
- AI टूल्स डिझाइन सॉफ्टवेअरमध्ये एकत्रित केले जातात, ज्यामुळे लेआउट आणि आकारमान जलद होते.
- कमी पुनरावृत्ती होणारी कामे करून ग्राफिक डिझायनर्स स्टोरी टेलिंग आणि रणनीतीवर अधिक लक्ष केंद्रित करू शकतात.

### AI काय करू शकते आणि काय करू शकत नाही ?

AI टूल्स दृश्य भिन्नता तयार करण्यात, कंटाळवाणे, पुनरावृत्ती होणारी कामे स्वयंचलित करण्यात आणि नवीन कल्पना निर्माण करण्यात उत्कृष्ट आहेत. परंतु जेव्हा भावना, संदर्भ आणि रणनीतीचा विचार केला जातो तेव्हा मानव आवश्यक असतात. म्हणूनच, क्लायंटना अजूनही अशा ग्राफिक डिझायनर्सची आवश्यकता असते जे त्यांच्या कल्पना समजून घेऊ शकतील आणि त्यांना योग्य व्हिज्युअलमध्ये बदलतील. प्रोजेक्ट योग्य दिशेने नेऊ शकतील आणि ब्रँड ओळख राखू शकतील. ग्राफिक डिझायनरची सर्वात मोठी ताकद म्हणजे सर्जनशील विचारसरणी, समस्या सोडवणे आणि मानवी स्पर्श. तुम्ही या कौशल्यांवर जितके जास्त काम कराल तितके चांगले.

### ग्राफिक डिझायनर्स AI सह कसे प्रगती करू शकतात ?

- AI टूल्स शिका, पण ते तुमच्या सर्जनशील प्रक्रियेचा भाग आहेत.
- स्टोरीटेलिंग आणि युजर एक्सपिरीयन्सवर लक्ष केंद्रित करा.
- ब्रँडिंग आणि युएक्स सारख्या क्षेत्रात तज्ञ बना.
- तुमच्या पोर्टफोलिओमध्ये फक्त डिझाइनच नाही तर विचारसरणी आणि प्रकल्प व्यवस्थापन देखील दाखवा.

**एआय डिझाइन प्रक्रिया जलद आणि सोपी करत आहे, परंतु ती कार्यान्वित करण्यासाठी मानवी सर्जनशीलता अजूनही आवश्यक आहे. जे लोक आर्टिफिशियल इंटेलिजेंसच्या सहकार्याने त्यांचे विचार आणि सर्जनशीलता वाढवत राहतील ते या युगात ग्राफिक डिझाइनच्या जगात टिकून राहतील.**

# दूध विक्रेत्याची मुलगी बनली आयएएस!

## दोनदा यूपीएससी केली उत्तीर्ण, ही यशोगाथा तुम्हाला रडवेल...

**गरीब कुटुंबात जन्मलेल्या या मुलीची मोठी स्वप्ने होती. कोचिंगसाठी पैसे उभारणे कठीण होते, परंतु तिने चिकाटीने मेहनत घेतली. वडिलांच्या दूध विक्रीमुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह होत होता. मात्र कठोर परिश्रम आणि योग्य दिशेने चालत राहिले तर अशक्य देखील शक्य होते. उत्तराखंडच्या रहिवासी अनुराधा पालने हेच सिद्ध केले आहे. सतत प्रयत्न आणि आत्मविश्वासाने तिने यूपीएससीची तयारी सुरू केली आणि दोनदा परीक्षा उत्तीर्ण केली. ती ६२ व्या क्रमांकावर आयएएस अधिकारी बनली. अनुराधाची यशोगाथा सांगते की परिस्थिती कितीही कठीण असली तरी, दृढनिश्चय असेल तर ध्येय साध्य करता येते...**



- गरिबीत गेले बालपण, जेएनव्हीमध्ये शिकली : अनुराधा हरिद्वारची रहिवासी आहे. ती एका साध्या कुटुंबातून येते. लहानपणी तिला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. तिचे वडील कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी दूध विकत होते. याही परिस्थितीत त्यांनी मुलीचे शिक्षण सुरू ठेवले. त्यासाठी सकाळ-संध्याकाळ दूध विकल्यानंतर दिवसभर त्यांनी दुसऱ्याकडे मिळेल ते काम केले. अनुराधा हरिद्वारच्या जवाहर नवोदय विद्यालयात शिकली.
- अभियांत्रिकी, नोकरी आणि नंतर यूपीएससी तयारी : अनुराधाने अभियांत्रिकीची पदवी मिळवली. त्यानंतर तिच्या कुटुंबाची परिस्थिती पाहता तिने खासगी नोकरी स्वीकारली. नोकरीत काही काळ राहिल्यानंतर तिला समजले की यूपीएससी हे तिचे खरे ध्येय आहे. तिने खासगी नोकरी सोडली आणि यूपीएससीची तयारी सुरू केली. या काळात तिने रुरकी येथील एका महाविद्यालयात व्याख्याता म्हणून काम करण्यास सुरुवात केली.
- पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण, पण गुण कमी : २०१२ मध्ये अनुराधाने पहिल्यांदा यूपीएससी दिली. ती उत्तीर्ण झाली. मात्र ऑल अराऊंड स्कोअर (४५१) कमी होता. त्यामुळे तिने तयारी सुरूच ठेवली. ती दिल्लीत आली आणि यूपीएससीची तयारी करून घेणाऱ्या अकॅडमीत प्रवेश घेतला. अनुराधा दुसऱ्या प्रयत्नातही यूपीएससी उत्तीर्ण झाली, २०१५ च्या यूपीएससी परीक्षेत ६२ वा रँक मिळवला.

**अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जॉइंट एंट्रेन्स एक्झाम (JEE Main) २०२६ ची शर्यत सुरू झाली आहे. मागील अनुभवांच्या आधारे, राष्ट्रीय चाचणी संस्थेने (NTA) विद्यार्थ्यांना सुविधा देण्यासाठी आणि परीक्षेदरम्यान होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी अनेक नवीन पावले उचलली आहेत. एक महिन्यापूर्वी, २९ सप्टेंबर रोजी, NTA ने उमेदवारांना आधार अपडेटसह सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करण्याचा सल्ला जारी केला. JEE Main च्या पहिल्या टप्प्यासाठी ऑनलाइन नोंदणी सुरू झाली आहे. NTA ची JEE Main ही पहिली परीक्षा असेल, ज्यामध्ये डॉ. के. राधाकृष्णन समितीच्या परीक्षा सुधारणांच्या शिफारशी लागू करून नियम तयार केले गेले आहेत.**



# लाइव्ह फोटो, ४ शहरे आणि... जेईई मेनमध्ये पहिल्यांदाच झालेत हे बदल

### पसंतीच्या शहरात कसे मिळेल परीक्षा केंद्र

उमेदवारांना त्यांच्या पसंतीच्या शहरात परीक्षा केंद्र मिळेल, यासाठी एनटीएने प्रयत्न केला आहे. परीक्षा केंद्रे दूरवर असल्याच्या तक्रारी लक्षात घेता विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्तमान आणि मूळ पत्त्याच्या जवळपासची जास्तीत जास्त चार शहरे निवडण्याचा पर्याय दिला जाईल, असा निर्णय घेण्यात आला आहे. जेव्हा विद्यार्थी फॉर्म भरतात आणि त्यांचे मूळ आणि वर्तमान पत्ते नमूद करतात, तेव्हा या दोन पत्त्यांवर आधारित शहरांची यादी दिसेल. उदाहरणार्थ, जर एखाद्या विद्यार्थ्याचा कायमचा पत्ता उत्तर प्रदेश असेल आणि सध्याचा पत्ता दिल्ली असेल, तर या दोन राज्यांमधील परीक्षा केंद्रे कुठे असतील याची यादी दिसेल. या यादीच्या आधारे, विद्यार्थी त्यांच्या पसंतीची चार शहरे निवडू शकतात. एनटीए अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, शक्यतो विद्यार्थ्यांच्या निवडलेल्या पर्यायांमधून परीक्षा शहरे वाटली जातील. उमेदवारांच्या सोयीसाठी परीक्षा शहरांची संख्या वाढविण्यात आली आहे. पूर्वी परीक्षा शहरांची संख्या २९९ होती, जी आता ३२३ पर्यंत वाढवण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या पसंतीच्या शहरात परीक्षा केंद्रे वाटली जातील याची खात्री करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

### लाईव्ह फोटोदेखील आवश्यक

या वर्षीच्या परीक्षेसाठी ऑनलाइन फॉर्म भरताना, विद्यार्थ्यांना लाईव्ह फोटोदेखील अपलोड करावा लागेल. त्यांच्या नवीनतम छायाचित्राची स्कॅन केलेली प्रतिमा, जेपीजी किंवा जेपीईजी स्वरूपात देखील आवश्यक असेल. पूर्वी, विद्यार्थ्यांना त्यांचा स्वतःचा फोटो अपलोड करावा लागत होता, परंतु अनेकदा असे दिसून आले की विद्यार्थ्यांनी अनेक वर्षे जुने फोटो अपलोड केले होते, ज्यामुळे अनेकदा चुकांच्या तक्रारी येत होत्या. यावेळी, दुहेरी तपासणी होईल. एक नवीनतम फोटो असेल आणि एक लाईव्ह फोटो देखील असेल.

### अनेक फॉर्म भरल्याने होऊ शकते कारवाई

याचा अर्थ असा की जो विद्यार्थी फॉर्म भरेल, तोच परीक्षेला यावा. जर दोन्ही फोटो एकसारखे नसतील, तर सिस्टम उमेदवाराला सतर्क करेल. जुना फोटो अपलोड केल्याने अशा समस्या उद्‌भवू शकतात. अशा परिस्थितीत, विद्यार्थ्यांनी अलीकडील फोटोची स्कॅन केलेली प्रतिमा अपलोड करावी. ती रंगीत फोटो असावी, ज्यामध्ये उमेदवाराचा ८०% चेहरा दिसत असेल. विद्यार्थ्यांनी फक्त एकच अर्ज भरला आहे याची खात्री करावी. जर अनेक फॉर्म भरले असतील तर कारवाई केली जाईल. कृपया अर्जावर ईमेल आयडी आणि मोबाईल नंबर काळजीपूर्वक भरा.

### सध्या परीक्षेच्या पहिल्या टप्प्यासाठी अर्ज

जेईई मेन दोन टप्प्यांत घेतली जाते. पहिल्या टप्प्यांसाठी अर्ज २७ नोव्हेंबरपर्यंत करता येतील आणि ही परीक्षा २१ ते ३० जानेवारी दरम्यान होईल. पहिल्या टप्प्याचे निकाल १२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत जाहीर केले जातील. दुसऱ्या टप्प्यासाठी बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यापासून नोंदणी करण्याची संधी मिळेल. दुसरा टप्पा १ ते १० एप्रिल दरम्यान होईल आणि दोन्ही टप्प्यांवर आधारित अंतिम निकाल २० एप्रिलपर्यंत जाहीर केले जातील. ही परीक्षा संगणक-आधारित चाचणी (सीबीटी) पद्धतीने घेतली जाईल. पहिली शिफ्ट दररोज सकाळी ९ ते दुपारी १२ वाजेपर्यंत असेल आणि दुसरी शिफ्ट दुपारी ३ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत असेल.



- ई-केवायसी देखील लागू : या वर्षीच्या परीक्षेसाठी ई-केवायसी देखील लागू केले आहे. ही प्रणाली उमेदवारांच्या ओळखीची डिजिटल पडताळणी करण्यास अनुमती देईल. नाव, जन्मतारीख आणि छायाचित्र यासारख्या माहितीचा वापर करून आधार प्रमाणीकरण केले जाते. हे UIDAI च्या सेंट्रल आयडेंटिटीज डेटा रिपॉझिटरी (CIDR) द्वारे केले जाते. आधार कार्डमध्ये पालकांचे नाव नसल्यामुळे ही माहिती ऑनलाइन अर्ज फॉर्ममध्ये भरावी लागेल. दहावीच्या प्रमाणपत्र आणि आधार कार्डमध्ये कोणताही फरक नसावा.
- एक्झाम पॅटर्न : बीई/बीटेक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची परीक्षा जास्तीत जास्त ३०० गुणांची असेल. दोन विभाग असतील. पहिल्या विभागात गणित, भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्राचे प्रत्येकी २० प्रश्न असतील, जे सर्व MCQ-आधारित असतील. दुसऱ्या विभागात प्रत्येकी ५ संख्यात्मक मूल्याचे प्रश्न असतील. एकूण ७५ प्रश्न असतील. नकारात्मक गुण लागू केले जातील. बरोबर उत्तरांना ४ गुण दिले जातील आणि चुकीच्या उत्तरांना १ गुणाचे नकारात्मक गुण दिले जातील.
- अपंग विद्यार्थ्यांसाठी प्रगत सुविधा : एनटीएने स्थापित मार्गदर्शक तत्त्वांनुसार अपंग विद्यार्थ्यांना अतिरिक्त सुविधा देण्याची तयारी केली आहे. दृष्टीदोष असलेल्या विद्यार्थ्यांसाठी झूम पातळी वाढवण्यात आली आहे आणि केंद्रे अपंग विद्यार्थ्यांसाठी अधिक सुविधा देखील देतील.

# या १० नोकऱ्यांचे काहीच बिघडवू शकणार नाही एआय !

**आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) मुळे अमेरिकेतील अनेक प्रमुख टेक कंपन्यांमध्ये नोकऱ्या कमी झाल्या आहेत. अलिकडेच, ॲमेझॉननेही एआय हे प्राथमिक कारण असल्याचे सांगून हजारो लोकांना कामावरून काढून टाकले आहे. तथापि, एआय नोकऱ्या काढून घेत असताना, काही नोकऱ्या अशा आहेत ज्यांचे एआय काहीच बिघडवू शकत नाही. अशा १० नोकऱ्या आहेत, ज्या नोकऱ्या चांगले पगार देतात. मात्र एआयच्या पोहोचपासून कितीतरी दूर आहेत...**



- डेंटल हाइजीनिस्ट : डेंटल हाइजीनिस्टच्या नोकरीला एआय हानी पोहोचवू शकत नाही. या नोकरीसाठी असोसिएट डिग्री आणि परवाना आवश्यक आहे. डेंटल हाइजीनिस्ट दात स्वच्छ करण्याशी संबंधित कामे हाताळतात. हे क्षेत्र ७% दराने वाढण्याचा अंदाज आहे.
- डायग्नोस्टिक मेडिकल सोनोग्राफर : डायग्नोस्टिक मेडिकल सोनोग्राफरचे क्षेत्र १३% दराने वाढण्याची अपेक्षा आहे. डायग्नोस्टिक मेडिकल सोनोग्राफरच्या कामात इमेजिंग तंत्रज्ञानाचा समावेश असतो आणि त्यासाठी असोसिएट पदवी आवश्यक असते.
- रेस्पिरेटरी थेरपिस्ट : श्वसन थेरपिस्टच्या क्षेत्रात १२% वाढ होत आहे. रुग्णालये आणि क्लिनिकमध्ये असोसिएट डिग्री असलेल्या श्वसन थेरपिस्टची आवश्यकता आहे. ते लोकांना श्वास घेण्यास मदत करतात.
- रेडिओलॉजिक आणि एमआरआय टेक्नॉलॉजिस्ट : इमेजिंग उपकरणे आणि आरोग्यसेवेशी निगडित मशीन्स चालवण्यासाठी रेडिओलॉजिक आणि एमआरआय टेक्नॉलॉजिस्टची आवश्यकता असते. रेडिओलॉजिक आणि एमआरआय टेक्नॉलॉजिस्टचा विकास दर ५% आहे.
- ऑक्युपेशनल थेरपी असिस्टंट : रुग्णांची हालचाल पुनर्संचयित करण्याचे काम व्यावसायिक थेरपी असिस्टंट करतात. हे पद असोसिएट पदवीसह मिळू शकते. नोकरीत वाढ १८% आहे.
- विंड टर्बाइन टेक्निशियन : स्वच्छ ऊर्जेकडेर जगाचे लक्ष वेगाने वाढत आहे. या संदर्भात, पवनचक्क्या बांधणाऱ्या विंड टबाईन टेक्निशियनची आवश्यकता आहे. या क्षेत्रात नोकरीत वाढ ५०% आहे.
- सर्जिकल असिस्टंट आणि टेक्निशियन : शस्त्रक्रियेसाठी तपशीलांकडे लक्ष देणे आवश्यक आहे, म्हणूनच सर्जिकल असिस्टंट आणि टेक्निशियनच्या नोकऱ्या देखील एआयपासून वाचल्या आहेत. या क्षेत्रात नोकरीत वाढ ५% आहे.
- इलेक्ट्रीशियन : उच्च-कुशल डिप्लोमा किंवा तांत्रिक प्रशिक्षण प्रमाणपत्र मिळवून इलेक्ट्रिशियन बनता येते. या क्षेत्रात नोकरी वाढ ९% आहे. एआयच्या आगमनानंतरही लोकांना अजूनही इलेक्ट्रिशियनची आवश्यकता आहे.
- हीटिंग, एअर कंडिशनिंग आणि रेफ्रिजरेशन मेकॅनिक : जर तुम्ही हीटिंग, एअर कंडिशनिंग आणि रेफ्रिजरेशन मेकॅनिक म्हणून काम करत असाल, तर हे क्षेत्र ८% दराने वाढत आहे. तुम्ही ही नोकरी पोस्ट-सेकंडरी प्रमाणपत्रासह मिळवू शकता.

## शॉर्ट न्यूज

### तीन मल्लांची महाराष्ट्र कुस्ती संघात निवड

**पारनेर :** पारनेरचे मल्ल चेतन रेपाळे, निलेश उचाळे आणि कर्जतची गोल्डन गर्ल सोनाली मंडलिक यांची हरियाणातील रोहतक येथे १० ते १२ जुलै २०२६ दरम्यान होणाऱ्या २३ वर्षांखालील राष्ट्रीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. महर्षी दयानंद विद्यापीठ येथे होणाऱ्या या स्पर्धेत हे खेळाडू फ्री-स्टाइल आणि ग्रीको-रोमन प्रकारात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील. चेतन रेपाळेची १२५ किलो गटातील तपोवन हनुमान केसरी किताबाची कामगिरी, निलेश उचाळेचे ८२ किलो गटातील राज्यस्तरीय सुवर्णपदक आणि सोनाली मंडलिकचे खेलो इंडियातील सुवर्णपदक व ४० पदकांचा विक्रम लक्षात घेऊन त्यांची निवड झाली आहे.

### रेल्वेच्या धडकेत तरुणीचा मृत्यू

**देहरे :** भागातील नवभारत विद्यालयानजीक राहणाऱ्या १७ वर्षीय तृप्ती प्रकाश खरात हिचा विळद जवळील पाण्याच्या टाकीपाशी रेल्वेच्या धडकेत दुर्दैवी मृत्यू झाला. रेल्वेने जोरदार धडक दिल्याने तृप्ती गंभीर जखमी झाली होती. स्थानिक नागरिकांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधून तिला रुग्णवाहिकेने नगर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन शिंदे यांनी तिला उपचारापूर्वीच मृत घोषित केले.

### कत्तलखान्यांवर एलसीबीची कारवाई

**अहिल्यानगर :** शहरात सुरू असलेल्या कत्तलखान्यांवर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत तिघा संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून ७६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कोतवाली पोलीस ठाण्यात मुनावर फकीर सय्यद, नविद रफिक कुरेशी आणि सालीम फय्याज अहमद कुरेशी या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे आरोपी सुभेदार गल्ली, झेंडीगेट, अहिल्यानगर येथील रहिवासी आहेत.

### तरुणाची राहत्या घरात आत्महत्या

**देवळाली प्रवरा :** येथे २८ वर्षीय शुभम बाबासाहेब खांदे यांनी राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केली. पहाटेच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. स्थानिक तरुणांच्या मदतीने त्यांना राहुरी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि तीन वर्षांची मुलगी असा परिवार आहे.

### पिकअपच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**जामखेड :** शहरातील बीड रस्त्यावरील मुंढे हॉस्पिटलसमोर रात्री साडेदहा वाजता झालेल्या एका भीषण रस्ते अपघातात ३२ वर्षीय दुचाकीस्वार सिद्धेश्वर गणेश म्हेत्रे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. रस्त्याच्या बाजूला थांबलेल्या सिद्धेश्वर यांना पाठीमागून आलेल्या भरधाव पिकअपने धडक दिली. जामखेड-सौताडा राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम, वाढती अतिक्रमणे, पार्किंगची सोय नसणे आणि वाहतुकीतील त्रुटींमुळे हा अपघात घडल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

# एकल माता भगिनींच्या हस्ते वटवृक्षारोपण!

**पुरोगामी विचार, स्त्री सन्मान आणि पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संगम**
**कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनचा उपक्रम सर्वत्र चर्चेत**

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**भारतीय संस्कृतीतील परंपरा, सामाजिक समता, स्त्री सन्मान आणि पर्यावरण संवर्धन या मूल्यांचा सुंदर संगम साधणारा एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम यंदाही उत्साहात पार पडला. दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके यांच्या संकल्पनेतून एकल माता भगिनींच्या हस्ते वटवृक्षाचे रोपण करून वटपौर्णिमा साजरी करण्याचा अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला. समाजातील वंचित, उपेक्षित आणि संघर्षमय जीवन जगणाऱ्या एकल माता भगिनींना सन्मानाचे स्थान देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचा हा प्रयत्न सर्व स्तरातून कौतुकास्पद ठरत आहे.**



भारतीय संस्कृतीत वटवृक्षाला दीर्घायुष्य, स्थैर्य, संरक्षण आणि जीवनदायी शक्तीचे प्रतीक मानले जाते. त्याच वटवृक्षाच्या साक्षीने समाजातील एकल माता भगिनींना सन्मानपूर्वक व्यासपीठ देऊन त्यांच्याप्रती आदर, संवेदना आणि सामाजिक बांधिलकी व्यक्त करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. परंपरा आणि आधुनिक सामाजिक जाणिवा यांची सांगड घालत स्त्री सन्मानाला नवा आयाम देण्याचा हा उपक्रम समाजासाठी एक प्रेरणादायी आदर्श ठरत आहे.

या उपक्रमाचे हे सलग दुसरे वर्ष असून, मागील वर्षीप्रमाणे यंदाही या उपक्रमाला समाजातील विविध स्तरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वटपौर्णिमा हा सण केवळ धार्मिक आणि पारंपरिक स्वरूपात साजरा न करता, त्यामध्ये सामाजिक समता, स्त्री सक्षमीकरण आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा समावेश करून पुरोगामी विचारांचा संदेश देण्याचा प्रयत्न कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनच्या माध्यमातून सातत्याने केला जात आहे.

समाजात अनेकदा एकल माता भगिनींना संघर्ष, उपेक्षा आणि सामाजिक दबावाला सामोरे जावे लागते. मात्र, त्यांना केवळ सहानुभूतीची नव्हे तर सन्मानाची गरज आहे, या विचारातून या उपक्रमाची संकल्पना साकारण्यात आली. एकल महिलांच्या संघर्षाला सलाम करत, त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देण्याचा आणि समाजात त्यांचे योगदान अधोरेखित करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.

यावेळी उपस्थित प्रत्येक एकल माता भगिनींच्या हस्ते वटवृक्षाचे रोपण करण्यात आले. वृक्षारोपणानंतर उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेतली. ''आज लावलेला एक वृक्ष म्हणजे उद्याच्या अनेक पिढ्यांसाठी जीवनाचा आधार'' हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय असंतुलनाच्या पार्श्वभूमीवर वृक्ष संवर्धनाची गरज अधोरेखित करत प्रत्येक नागरिकाने पर्यावरण रक्षणासाठी योगदान देण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून मा. स्थायी समिती सभापती सुवर्णाताई जाधव, नगरसेविका वैशालीताई नळकांडे, आपला मावळा महिला प्रदेशाध्यक्षा प्रियंका पाटील शेळके - बोबडे, सामाजिक सेविका अश्विनी झरेकर, गायत्री बागडे, शारदा विधावे, रेणुका नाळके, आशा शेळके, माधुरी शेळके, मंदाकिनी पवार, साक्षी बागडे, तसेच नरेंद्र पवार, प्रणव पवार, युगांक दुशिंग व भारत धारवाले यांची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. समाजातील एकल माता भगिनींना सन्मानाने समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. स्त्री सन्मान, सामाजिक समता आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा संगम घडविणारा हा उपक्रम समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके यांनी यावेळी बोलताना सांगितले की, ''वटपौर्णिमा हा सण केवळ परंपरा म्हणून साजरा करण्यापेक्षा त्याला सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीची जोड देणे आवश्यक आहे. समाजातील एकल माता भगिनींना सन्मान देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचा आमचा प्रयत्न आहे. भविष्यात हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राज्यभर राबविण्याचा आमचा मानस आहे.''

पर्यावरण संरक्षण, स्त्री सक्षमीकरण, सामाजिक समता आणि पुरोगामी विचारसरणी यांचा सुंदर त्रिवेणी संगम साधणारा हा उपक्रम आज समाजासाठी एक नवा आदर्श निर्माण करत आहे. समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे आणि सामाजिक परिवर्तनाची सुरुवात कृतीतूनच होते, हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.

परंपरेला आधुनिक सामाजिक जाणिवेची जोड देत, एकल माता भगिनींच्या सन्मानातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनचा हा उपक्रम निश्चितच समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, सर्व स्तरातून त्याचे मोठ्या प्रमाणावर स्वागत आणि कौतुक होत आहे. भविष्यातही अशाच सामाजिक, पर्यावरणपूरक आणि पुरोगामी विचारांच्या उपक्रमांद्वारे समाजसेवेचा वसा अधिक व्यापक करण्याचा निर्धार फाउंडेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

(पान १ वरून)

### शॉक लागून दोन दुभत्या म्हशींचा मृत्यू

टाकला होता. या बेकायदेशीर जोडणीमधील वीजप्रवाह परिसरातील जमिनीत उतरल्याने संपूर्ण परिसर धोकादायक बनला होता. चरत असलेल्या म्हशी या वीजप्रवाहाच्या संपर्कात आल्याने त्यांना जोरदार विजेचा धक्का बसला. त्यामध्ये एक जाफराबादी आणि एक म्हशाण जातीची दुभती म्हैस जागीच मृत्युमुखी पडली.

या घटनेमुळे दूध व्यवसायावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. ग्रामीण भागात अनधिकृत वीजजोडण्यांमुळे होणाऱ्या अपघातांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, अशा प्रकारांवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

नीलेश आहेरगवळी यांच्या तक्रारीवरून कॅम्प पोलीस ठाण्यात अशोक कराळे आणि आबा कराळे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अकोलकर या घटनेचा पुढील तपास करीत आहेत.

### भोयरे गांगर्डा येथे घरफोडी

रक्कम गायब असल्याचे लक्षात येताच निवृत्ती पवार यांनी तातडीने सुपा पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दाखल केली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आणि प्राथमिक तपास सुरू केला.

या फिर्यादीवरून सुपा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०५(अ) आणि ३३१(४) अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सुपा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल निमसे करीत आहेत.

दरम्यान, ग्रामीण भागात बंद घरे हेरून चोरी करणाऱ्या टोळ्यांच्या हालचाली वाढत असल्याने नागरिकांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण आहे. घरफोडीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर रात्रीची पोलीस गस्त वाढवून अशा गुन्ह्यांना आळा घालावा आणि आरोपींना तातडीने अटक करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

### भरधाव डंपरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

याबाबत मृत महिलेचे पती अरबाज समीउल्ला चौगुले (वय २६) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ जून रोजी दुपारी अडीचच्या सुमारास अरबाज चौगुले हे पत्नी कांचन उर्फ अरमीना यांच्यासह त्यांच्या एमएच १६ डीएल ३२११ क्रमांकाच्या दुचाकीवरून नगरपुणे महामार्गाने जात होते.

केडगाव बायपास चौकाजवळील नील हॉटेलसमोरील स्पीड ब्रेकर आल्याने त्यांनी दुचाकीचा वेग कमी केला. त्याचवेळी पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या अशोक लेलँड कंपनीच्या एमएच १७ सीव्ही २४०२ क्रमांकाच्या डंपरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी मोठी होती की, दुचाकीच्या पाठीमागे बसलेल्या कांचन उर्फ अरमीना या गंभीर जखमी झाल्या आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

या घटनेनंतर अरबाज चौगुले यांनी रात्री कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार डंपर चालक शिवाजी लक्ष्मण कोठे (रा. कोल्हार, ता. राहाता) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब) आणि १७७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नगरपुणे महामार्गावरील वाढती वाहतूक, भरधाव अवजड वाहनांचा वेग आणि स्पीड ब्रेकरजवळ होणारी निष्काळजी वाहनचालकांची वर्तणूक यामुळे या मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली असून, अशा वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात येत आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

**वाचकांच्या लेखणीतून**

# बालकवितेच्या शिलाचा प्रश्न

शालेय पाठ्यपुस्तकातील मराठी बालकवितांची निवड पाहून मन उदास होते. एक काळ ग.ह.पाटील, वा.भा. पाठक, इंदिरा संत, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर अशा नामांकित कवींच्या बालकविता पाठ्यपुस्तकात असायच्या. त्या आशयघन, लय आणि नाद सांभाळून असत.

माझ्या मामाची रंगीत गाडी हो
तिला खिल्लाऱ्या बैलांची जोडी हो
कशी दौडत दौडत येई हो
मला आजोळी घेऊन जाई हो

ही ग.ह.पाटील यांची बालकविता पहा किंवा वा.भा.पाठक यांची शिवराय आणि बालवीर या कवितेचे हे दोन चरण पहा-

खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे चिंधड्या
उडवीन राई राई एवढ्या

अथवा मंगेश पाडगावकरांची ही बालकविता पहा-

अंघोळीला बसला बाबू
हातात घेतला साबू
साबूचा केला फेस
धुतले सारे केस
डोळ्यात गेला साबू
रडत बसला बाबू

बालकविता सुबोध असावी. आकाराने ती आटोपशीर असावी. तिच्यात शक्य तो जोडशब्द नसावेत. अशी अपेक्षा असते. मुलांना कवितेतील अर्थापेक्षाही प्रासानुप्रास, लय, ताल आणि नाद यांची फार आवड असते.

आणखी एका सुंदर बालकवितेचे हे वर्णन पहा-

एक होती इडली
ती होती चिडली
धावत धावत आली
सांबरात जाऊन बुडली
सांबर होते गरम गरम
इडली झाली नरम नरम....

आता ही बालकविता पहा-

बदका बदका नाच रे
तुझी पिल्ले पाच रे

या बालकवितेतील बदकाने का नाचावे? आणि त्याची पिल्ले पाचच का? याच्याशी बालकांना फारसे सोयर सुतक नसते. लय, ताल आणि नाद या गुणांबरोबरच त्यांना कवितेचा आशयही समजला तर दुधात साखर! त्यासाठी २४ ऑगस्ट २०२५ च्या पारनेर दर्शन दैनिकात बालकवितेतील नाट्य आणि नाद शीर्षकाचा माझा एक लेख प्रकाशित झाला आहे.

हल्ली मुलांच्या पाठ्यपुस्तकांत वशिल्यांच्या तट्टूंच्या बालकविता आणि धडे निवडले जातात असेही ऐकिवात



आहे. असे असेल तर ते भयंकरच म्हणावे लागेल!

माझ्या दोन नाती (मुलाच्या मुली) आहेत. मुंबईत शाळा शिकत आहेत. थोरली नात पाचवीत तर धाकटी तिसरीत शिकत आहे. गेल्या उन्हाळ्याच्या सुट्टीत त्या आमच्याकडे गावी आल्या होत्या. संध्याकाळी मी त्यांना फिरायला घेऊन जाई. थोडा वेळ ओढ्यावरच्या पुलाकाठी कठड्यांवर बसून मी त्यांना प्राण्यांची शाळा या माझ्या बालकविता संग्रहातील दोन कविता शिकवल्या. त्यांच्याकडून तालासुरात पाठही करवून घेतल्या. या बालकविता लय आणि नाद असल्याने त्या त्यांना लगेच पाठही झाल्या!

पहिली बालकविता होती ससा आणि घसा-

एक होता ससा
त्याचा बसला घसा
गप्पा नाही गाणे
राही केविलवाणे....

दुसरी बालकविता होती नवनवलाची नवी बाहुली-

नवनवलाची नवी बाहुली कुठे हरवली बाई
शोधशोधली तरी सापडत नाही
बाबांनी ती बाजारातून काल आणली होती
किती छान मी तिला नटविली होती
लाल बांगड्या, लालच कुंकू, डुल मोत्यांचे लाल
गोड गुलाबी मऊ मऊ होते गाल.....

अन्य अनेक कवींच्या बालकविताही आशयघनता, प्रासानुप्रास, लय, ताल व नाद या गुणांनी संपन्न असतील. अशा कवींच्या बालकविता पाठ्यपुस्तकात समाविष्ट का होऊ नयेत?

इथे वशिला महत्त्वाचा नसून बालकवितेच्या शिलाचा प्रश्न महत्त्वाचा आहे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहिल्यानगर

(पान १ वरून)

### कोयता-तलवारीसह दहशत माजविणाऱ्याला अटक

झडती घेतली असता एक धारदार तलवार आणि लोखंडी कोयता आढळून आला. दोन्ही शस्त्रे पोलिसांनी जप्त केली असून आरोपीला अटक करून त्याच्याविरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गणेश देशमुख तसेच गुन्हे शोध पथकातील विजय ठोंबरे, रोहिणी दरंदले, राहुल शिंदे, बाळकृष्ण दौंड, विनोद बोरगे, साबीर शेख, विशाल दळवी, दीपक रोहोकले, दत्तात्रय कोतकर, शिरीष तरदे, रमेश शिंदे, अतुल काजळे, अमोल गाडे, सूरज कदम, सत्यम शिंदे, अतुल लाटे, सचिन लोळगे, संकेत धिवर, महेश पवार, पल्लवी रोहकले आणि राहुल गुंडू यांनी केली.

### दिव्यांग प्रतीक लांडे बनला राज्यकर सहाय्यक आयुक्त

एमपीएससीतून दुय्यम निबंधक पदावर निवड झाली होती. त्या पदाचे प्रशिक्षण सुरू असतानाही त्यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास अखंडपणे सुरू ठेवला. त्या सातत्यपूर्ण मेहनतीचे फळ म्हणून आता त्यांची राज्यकर सहाय्यक आयुक्त (श्रेणी-१) पदावर निवड झाली आहे.

प्रतीक यांचा जन्म रांजणगाव गणपती येथे एका सर्वसामान्य कुटुंबात झाला. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. कुटुंबाची जेमतेम गुजराण होत असतानाच दिव्यांग मुलाचा जन्म झाल्याने आई-वडिलांवर मोठे संकट कोसळले. अशा कठीण परिस्थितीत त्यांच्या आजोबांनी त्यांचा सांभाळ करण्याची जबाबदारी स्वीकारली आणि त्यांना खंडाळे येथे आणले. पुढे त्यांचे मामा योगेश बांगर यांनी शिक्षणासाठी मोठा आधार देत प्रत्येक टप्प्यावर खंबीर साथ दिली.

प्रतीक यांचे इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे शिक्षण खंडाळे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. त्यानंतर आठवी ते दहावीचे शिक्षण दिघी येथील हायस्कूलमध्ये पूर्ण केले. पुढे ते पुन्हा गावी परतले आणि कोंढापुरी येथील सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये अकरावी व बारावीचे शिक्षण पूर्ण केले. २०१८ मध्ये सोनई येथील कृषी महाविद्यालयातून त्यांनी बी.एस्सी. ॲग्री पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी स्पर्धा परीक्षेच्या तयारीला सुरुवात केली. याचबरोबर त्यांनी कायद्याचे शिक्षणही सुरू ठेवले.

# ज्ञानरचना फाउंडेशनकडून शैक्षणिक किटचे वाटप

## लोणी मावळा येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातील वर्षभरासाठी शैक्षणिक साहित्य

लोणी मावळा : प्रतिनिधी

**शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत अधिकार असून आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबता कामा नये, या सामाजिक जाणीवेतून ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या वतीने लोणी मावळा येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत ३० विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी आवश्यक असलेल्या वह्या, दप्तर, कंपास बॉक्स तसेच इतर शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.**

कार्यक्रमात ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या संचालिका सुप्रिया मावळे चौधरी व सारिका मावळे यांच्या मातोश्री सुनंदा गौतम मावळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक प्रविण साळवे, भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नानाभाऊ मावळे, सचिव नवनाथ शेंडकर, सुरेश खोसे, मुख्याध्यापक मच्छिंद्र राऊत, विकास शेंडकर, श्रीराम शिंदे, बाबासाहेब दौंड, संतोष झरेकर, बाबाजी मावळे, बाळासाहेब मापारी, हरिभाऊ जाधव, रघुनाथ पवार, गुंड, अमृता लोंढे, आदिनाथ वाघ, विजय लाळगे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### सामाजिक बांधिलकीचे कार्य

प्रास्ताविकात संस्थेचे संचालक प्रविण साळवे यांनी ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या स्थापनेपासूनच्या कार्याचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, २०२३ मध्ये सुप्रिया मावळे चौधरी, सारिका मावळे आणि प्रविण साळवे यांच्या पुढाकारातून भारत सरकारकडे सेक्शन-८ कंपनी म्हणून संस्थेची नोंदणी करण्यात आली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी संस्था सातत्याने विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवत आहे.

### आर्थिक अडचणी शिक्षणाआड येऊ देणार नाही

यावेळी बोलताना संचालिका सुप्रिया मावळे चौधरी म्हणाल्या, शिक्षण हीच समाज परिवर्तनाची सर्वात मोठी ताकद आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये अमर्याद क्षमता असते; मात्र अनेकदा आर्थिक अडचणीमुळे त्या क्षमतेला योग्य दिशा मिळत नाही. अशा विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा हा आमचा छोटासा प्रयत्न आहे. कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण केवळ आर्थिक कारणांमुळे थांबू नये, यासाठी ज्ञानरचना सोशल फाउंडेशन सातत्याने कार्यरत राहील.

### महाराष्ट्र आणि गोव्यात कार्य

ज्ञानरचना सोशल फाउंडेशन महाराष्ट्र आणि गोवा या दोन राज्यांमध्ये शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि व्यावसायिक कौशल्य विकास या क्षेत्रांत कार्यरत आहे. संस्थेची एज्युकेशन मटेरियल बँक गेल्या चार वर्षांपासून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत आहे. संसाधनांच्या अभावामुळे एकाही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे सुप्रिया मावळे चौधरी यांनी स्पष्ट केले.

### शिक्षणासह विविध क्षेत्रांत उपक्रम

संस्थेच्या माध्यमातून एज्युकेशनल मटेरियल बँक, सामाजिक संस्थांसाठी क्षमता बांधणी प्रशिक्षण, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी सर्पदंश प्रतिबंधक जनजागृती, ग्रामीण महिलांसाठी शिलाई प्रशिक्षण केंद्र तसेच सामाजिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा राज्य व राष्ट्रीय स्तरावर गौरव सोहळा असे अनेक उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती प्रविण साळवे यांनी दिली.

### विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उपक्रम

संस्थेने उभारलेल्या शैक्षणिक साहित्य बँकेच्या माध्यमातून ग्रामीण, दुर्गम आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले जात आहे. तसेच शैक्षणिक साहित्याचा पुनर्वापर, डिजिटल अध्ययन साहित्याचे केंद्रीकरण, स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन आणि स्वयंअध्ययनाला प्रोत्साहन देण्याचे कार्यही संस्था सातत्याने करत आहे.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी भक्कम आधार मिळत असून समाजातील इतर संस्थांनीही अशा उपक्रमांत पुढाकार घ्यावा, असे मत व्यक्त केले.

# दत्तकृपा पतसंस्थेची दमदार घोडदौड

## २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

पिंपरी जलसेन : प्रतिनिधी

पिंपरी जलसेन येथील श्री दत्तकृपा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेसाठी संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेच्या गेल्या वर्षभरातील आर्थिक प्रगती, कामकाजाचा आढावा आणि आगामी वाटचालीबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.




### सभासदांच्या विश्वासातून प्रगती

सभेच्या प्रारंभी संस्थेचे संस्थापक चेअरमन लहूजी थोरात यांनी मागील वर्षातील कामकाजाचा आढावा सादर केला. सभासदांचा विश्वास, संचालक मंडळाचे सहकार्य आणि कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक मेहनतीमुळे संस्थेने सातत्याने उल्लेखनीय आर्थिक प्रगती साधल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यातही पारदर्शक कारभार आणि सभासदाभिमुख धोरण कायम ठेवून संस्था अधिक सक्षम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

### सहकार क्षेत्रातील शेळके कुटुंबाचे योगदान

जी.एस. महानगर बँकेचे संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके आणि माजी चेअरमन उदयदादा शेळके यांनी सहकार चळवळीच्या माध्यमातून जी.एस. महानगर बँक, मुंबई बँक तसेच जिल्हा सहकारी बँकांना राज्यात वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वामुळे पारनेर तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक बळ मिळाले. सहकार क्षेत्रातील त्यांचे योगदान आजही प्रेरणादायी असल्याची भावना नागरिकांनी यावेळी व्यक्त केली.

### आर्थिक स्थिती भक्कम

संस्थेची स्थापना १ ऑक्टोबर १९९६ रोजी झाली असून तिचे कार्यक्षेत्र संपूर्ण पारनेर तालुक्यात आहे. सध्या संस्थेच्या तीन शाखांद्वारे १ हजार ३३७ सभासदांना सेवा दिली जात आहे. संस्थेचे भागभांडवल ३७ लाख ६६ हजार रुपये, निधी १ कोटी ६ लाख ५३ हजार रुपये, ठेवी ७ कोटी ५६ लाख ५५ हजार रुपये, तर कर्जवाटप ५ कोटी ९९ लाख २२ हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहे. याशिवाय संस्थेची गुंतवणूक २ कोटी ७४ लाख ८० हजार रुपये, कायम मालमत्ता ३४ लाख ३६ हजार रुपये, बँक व रोख शिल्लक १५ लाख १३ हजार रुपये असून खेळते भांडवल तब्बल १० कोटी १ लाख ७९ हजार रुपये आहे. संस्थेने यंदा १६ लाख २४ हजार रुपयांचा निव्वळ नफा मिळविला असून अ ऑडिट वर्ग कायम राखला आहे.

### मान्यवरांची उपस्थिती

सभेस निवृत्त पोलीस अधिकारी अनिल वाढवणे, उद्योजक राजूशेठ लाळगे, संस्थापक चेअरमन लहूजी थोरात, व्हाइस चेअरमन रामदास शेळके, सरपंच सुरेश काळे, माजी उपसरपंच संदीप काळे, सोसायटी चेअरमन नारायण थोरात, संचालक आनंदा रणदिवे, सुमन कदम, नंदा घेमुड, माजी सरपंच बाबाजी वाढवणे, कोंडीभाऊ बोरुडे, सईद शेख, रेवजी कदम, अंबादास काळे, व्यवस्थापक निवृत्ती अडसरे, दगडू बोरुडे, माजी सरपंच राजेंद्र थोरात, भास्कर थोरात, तज्ज्ञ संचालक राहुल थोरात, भाजप युवा मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष नीलेश शेळके यांच्यासह अनेक मान्यवर व सभासद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादाभाऊ बोरुडे यांनी केले. व्हाइस चेअरमन रामदास शेळके यांनी आभार मानले. सभेच्या शेवटी संस्थेच्या आर्थिक कामगिरीबद्दल सभासदांनी समाधान व्यक्त करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. व्यवस्थापक निवृत्ती अडसरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# न्यायाच्या मागणीसाठी पवार कुटुंबाचे उपोषण

## आरोपींवर तातडीने कारवाईची मागणी

पोखरी : प्रतिनिधी

पोखरी येथील जागेच्या वादातून झालेल्या कथित जीवघेण्या हल्ला, जबरी चोरी आणि जीवे मारण्याच्या धमकीप्रकरणी संबंधित आरोपींवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी रावसाहेब कुंडलीक पवार यांनी सोमवारी (दि. २९ जून) ग्रामपंचायत कार्यालय, पोखरी येथे कुटुंबीयांसह आमरण उपोषण सुरू केले आहे. प्रशासनाने त्वरित न्याय द्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही उपोषणकर्त्यांनी दिला आहे.




### जीवघेण्या हल्ल्याचा आरोप

रावसाहेब पवार यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनानुसार, दि. २९ मे रोजी गावठाण गट क्रमांक १९ मधील जागेच्या वादातून त्यांच्या भावावर शिवम महादू पवार, प्रवीण विठ्ठल पवार, अक्षय महादू पवार, राजू बन्सी पवार, अमोल बन्सी पवार, मंदाबाई महादू पवार आणि अलका विठ्ठल पवार यांनी संगनमताने जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या हल्ल्यात त्यांच्या भावाच्या डोक्याला व पोटाला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करून उपचार करावे लागल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### मंगळसूत्र हिसकावले, व रोकड लुटली

याच घटनेदरम्यान भावाच्या पत्नीचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून नेण्यात आले, तसेच भावाच्या खिशातील १८ हजार रुपयांची रोकड काढून घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे. एवढ्यावरच न थांबता संबंधित आरोपींकडून सातत्याने जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याने संपूर्ण कुटुंब भीतीच्या छायेत जीवन जगत असल्याचा दावा पवार यांनी केला आहे.

### कारवाई होत नसल्याची खंत

या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करून जबाब नोंदविण्यात आला असला, तरी गंभीर स्वरूपाचा गुन्हा असूनही संबंधित आरोपींवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप रावसाहेब पवार यांनी केला आहे. आरोपींना राजकीय पाठबळ असल्यामुळेच पोलिसांकडून कारवाई टाळली जात असल्याचाही आरोप त्यांनी निवेदनातून केला आहे.

### प्रमुख मागण्या प्रशासनासमोर

उपोषणकर्त्यांनी प्रशासनाकडे संबंधित सर्व आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कायदेशीर कारवाई करावी, जबरी चोरी, मंगळसूत्र हिसकावणे आणि जीवे मारण्याच्या धमकीसंदर्भातील सर्व लागू कायदेशीर कलमांचा समावेश करून निष्पक्ष तपास करावा, तपास वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली करण्यात यावा तसेच पवार कुटुंबाला तातडीने पोलीस संरक्षण देण्यात यावे, अशा प्रमुख मागण्या केल्या आहेत.

### कुटुंबीयांचा सहभाग

न्याय मिळावा आणि प्रशासनाचे लक्ष वेधले जावे, या उद्देशाने रावसाहेब पवार यांच्यासह संतोष पवार, सार्थक पवार, रोहिणी पवार, सविता पवार आणि मीरा पवार हे कुटुंबीय आमरण उपोषणात सहभागी झाले आहेत. मागण्यांवर तातडीने निर्णय न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

# मनोहर अडसूळ यांना ‘समाजभूषण पुरस्कार’

## स्वराज्य सरपंच सेवा संघाकडून सन्मान

ढवळपुरी : प्रतिनिधी

तालुक्यातील भनगडेवाडी (ढवळपुरी) येथील सामाजिक कार्यकर्ते तथा भनगडेवाडी सेवा सोसायटीचे उपाध्यक्ष मनोहर लक्ष्मण अडसूळ यांना स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा ‘समाजभूषण पुरस्कार ’ जाहीर झाला आहे. सामाजिक क्षेत्रात निःस्वार्थ भावनेने सातत्याने केलेल्या कार्याची, जनहितासाठीच्या योगदानाची आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.



### समाजकारणासह शेतकरी हितासाठी योगदान

मनोहर अडसूळ यांनी सामाजिक कार्याबरोबरच कृषी क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. श्री स्वामी समर्थ ट्रान्सपोर्ट सर्व्हिस तसेच एलजी ट्रेडिंग कंपनी, कल्याण मार्केट यांच्या माध्यमातून शेतमालाची वाहतूक आणि विक्रीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत त्यांनी अनेक शेतकऱ्यांना आधार दिला आहे. सामाजिक जाण आणि यशस्वी उद्योजकता यांचा समन्वय साधत त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

### राज्यस्तरीय पुरस्काराची परंपरा

स्वराज्य सरपंच सेवा संघाच्या वतीने दरवर्षी समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव करण्यात येतो. जनसेवा हीच ईश्वरसेवा मानून समाजहितासाठी निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना प्रोत्साहन देणे हा या पुरस्कारामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

### ५ जुलै रोजी सन्मान सोहळा

‘समाजभूषण पुरस्कार’ प्रदान सोहळा रविवार, ५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर येथील माऊली संकुल सभागृह, सावेडी रोड येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या सोहळ्यात मनोहर अडसूळ यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

### सर्व स्तरातून अभिनंदन

राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्यानंतर मनोहर अडसूळ यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. युवा उद्योजक प्रकाश वाघ, उत्तम भनगडे, बंटी वाळुंज, सुरेश घुमटकर, संदीप औटी, तुषार चौगुले, भिकाजी ठोकळ, सचिन भनगडे, प्रमोद वाळुंज, सचिन जऱ्हाड आणि राहूल औटी यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. मनोहर अडसूळ यांच्या कार्याची राज्यस्तरावर झालेली दखल ही पारनेर तालुक्यासाठी अभिमानाची बाब मानली जात असून, हा सन्मान सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# धर्मकार्याची परंपरा जपणारे हावलदार कुटुंब ठरले प्रेरणास्थान

## मोहरमनिमित्त मळगंगा प्रसादालयाला २० किलो रोट अर्पण




निघोज : प्रतिनिधी

**धर्म, समाजसेवा आणि सर्वधर्मसमभावाची परंपरा जपत गेली अनेक दशके मंदिर, मस्जिद, अखंड हरिनाम सप्ताह तसेच विविध धार्मिक उपक्रमांना उदार हस्ते मदत करणाऱ्या निघोज येथील हावलदार कुटुंबाच्या कार्याचा गौरव करण्यात आला. मोहरमनिमित्त मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित मळगंगा प्रसादालयासाठी २० किलो रोट देणगी स्वरूपात देऊन हावलदार परिवाराने पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकी जपली.**

याप्रसंगी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ यांनी हावलदार कुटुंबाच्या धार्मिक आणि सामाजिक योगदानाचे कौतुक करताना, निघोज व परिसरातील मंदिर असो, मस्जिद असो किंवा अखंड हरिनाम सप्ताह, प्रत्येक धार्मिक कार्यात निस्वार्थपणे मदतीचा हात पुढे करणारे हावलदार कुटुंब समाजासाठी अनुकरणीय आहे, असे प्रतिपादन केले.

### स्मरणार्थ देणगीची परंपरा

पै. पापाभाई बुआजी हावलदार, पै. अब्दुलभाई फत्तुभाई हावलदार आणि पै. याकुबभाई पापाभाई हावलदार यांच्या स्मरणार्थ मोहरमनिमित्त मळगंगा प्रसादालयाला २० किलो रोट देणगी देण्यात आली. या उदात्त कार्याबद्दल ट्रस्टच्या वतीने हावलदार कुटुंबातील सर्व सदस्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, सहसचिव विश्वासराव शेटे आणि विश्वस्त रोहिदास लामखडे यांच्या हस्ते करण्यात आला.

### पन्नास वर्षांची सेवाभावी परंपरा

यावेळी बोलताना अमृताशेठ रसाळ म्हणाले की, हावलदार कुटुंबाने गेल्या पन्नास वर्षांपासून मंदिर, मस्जिद, अखंड हरिनाम सप्ताह तसेच मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित प्रसादालयाला सातत्याने देणगी देत सामाजिक आणि धार्मिक कार्याला बळ दिले आहे. सर्वधर्मसमभावाचा आदर्श समाजासमोर ठेवणारे हे कार्य निश्चितच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

### मान्यवरांची उपस्थिती


या कार्यक्रमास प्रगतीशील शेतकरी इस्माईल हावलदार, मकबूल हावलदार, उद्योजक गुलाबशेठ हावलदार, चाँदभाई हावलदार, पत्रकार सलीमभाई हावलदार, अलिमभाई हावलदार, निघोज सोसायटीचे संचालक असिमभाई हावलदार, ज्येष्ठ शिक्षक समीरभाई हावलदार, जी. एस. महानगर बँकेचे अधिकारी चाँदभाई याकुबशेठ हावलदार, गणीभाई हावलदार, महंमदभाई हावलदार, रफीकभाई हावलदार, रशीदभाई हावलदार, छोटुभाई हावलदार तसेच हावलदार कुटुंबातील अनेक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहसचिव विश्वासराव शेटे यांनी केले, तर विश्वस्त रोहिदास लामखडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# धनादेश अनादरप्रकरणी गोरेश्वरच्या कर्जदारांना कारावास

## कर्जाची रक्कम, व्याज व अतिरिक्त शिक्षेचेही आदेश

पारनेर : प्रतिनिधी

गोरेश्वर पतसंस्थेच्या कर्जाची परतफेड टाळून दिलेले धनादेश अनादरित झाल्याप्रकरणी अहिल्यानगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दोन कर्जदारांना दोषी ठरवत सश्रम कारावास, कर्जाची रक्कम, व्याज तसेच दंड न भरल्यास अतिरिक्त शिक्षा सुनावण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.




### दोन महिन्यांचा सश्रम कारावास

उद्योजक बचत गटाच्या कर्जप्रकरणात सादीक याकूब तांबोळी (वय ३८, रा. निघोज, ता. पारनेर) याने कर्जास मान्यता दिल्यानंतर पतसंस्थेला दिलेला धनादेश अनादरित झाला होता. याप्रकरणी न्यायालयाने त्यास परक्राम्य लिखत अधिनियमाच्या कलम १३८ अंतर्गत दोषी ठरवत दोन महिन्यांचा सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३५७(३) अन्वये ७१ हजार २५१ रुपये आणि त्या रकमेवर ७ ऑक्टोबर २०२४ पासून नऊ टक्के वार्षिक दराने व्याज अदा करण्याचे आदेश दिले.

### महिला बचत गटाच्या कर्जप्रकरणातही शिक्षा

दुसऱ्या प्रकरणात महिला बचत गटाच्या कर्जदार प्रविण दिनकर धाडगे (वय २९, रा. धाडगेवाडी) यालाही कलम १३८ अंतर्गत दोषी ठरविण्यात आले. न्यायालयाने तिला सश्रम कारावासाची शिक्षा सुनावत ७८ हजार २९ रुपये तसेच त्या रकमेवर २१ नोव्हेंबर २०२३ पासून ११ टक्के वार्षिक व्याज देण्याचे आदेश दिले. दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त शिक्षाही भोगावी लागणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

### नोटीस मिळूनही परतफेड नाही

दोन्ही कर्जदारांना कायदेशीर नोटीस बजावूनही त्यांनी कर्जाची परतफेड केली नव्हती. सादीक तांबोळी याने आपल्या आईच्या कर्जास मान्यता दिली होती, तर प्रविण धाडगे हा स्वतः कर्जदार होता. त्यामुळे दोन्ही प्रकरणांमध्ये न्यायालयाने उपलब्ध पुराव्यांच्या आधारे दोष निश्चित केला.

### ॲड. म्हस्के यांची प्रभावी बाजू

या दोन्ही प्रकरणांचा निकाल अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती एम. आर. खणवे यांच्या न्यायालयात लागला. गोरेश्वर पतसंस्थेच्या वतीने न्यायालयात आवश्यक पुरावे सादर करून प्रभावी बाजू मांडण्याचे काम ॲड. पी. बी. म्हस्के यांनी केले.

# ध्येय, जिद्द आणि शिक्षण हाच यशाचा मंत्र!

## आम्ही बी घडलो व्याख्यानमालेत सुनिल पोटे यांचे मार्गदर्शन

निघोज : प्रतिनिधी

**जीवनात यशस्वी होण्यासाठी आणि आपले ध्येय गाठण्यासाठी विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणासोबतच शिक्षण संस्कृतीचे महत्त्व ओळखणे आवश्यक आहे. सातवीपासूनच आपल्या आयुष्याचे ध्येय निश्चित करून त्यासाठी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाने प्रयत्न केले, तर कोणतेही यश अशक्य नाही, असे प्रतिपादन आपलं गाव फाउंडेशनचे उपाध्यक्ष तथा पिंपरी-चिंचवड येथील सायन्स पार्कचे मुख्याधिकारी सुनिल पोटे यांनी केले.**

बाभुळवाडा येथील केदारेश्वर विद्यालयात आपलं गाव फाउंडेशनच्या वतीने आयोजित आम्ही बी घडलो या प्रेरणादायी व्याख्यानमालेत ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते.




### राष्ट्रपती व पंतप्रधानांकडून शाबासकी

विद्यार्थ्यांसोबत राबविलेल्या विविध शैक्षणिक प्रकल्पांमुळे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक प्रकल्पांचे राष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी कौतुक केल्याने आत्मविश्वास अधिक वाढला आणि संस्थेने मुख्याधिकारीपदाची जबाबदारी सोपविली, असे त्यांनी नमूद केले.

### ग्रिामीण शिक्षण संस्कृतीची जपणूक करा

ग्रामीण भागातील शिक्षण संस्कृती अत्यंत समृद्ध आणि मूल्याधिष्ठित आहे. शहरात गेल्यानंतर या संस्कारांचा मोठा उपयोग होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी गावातील शिक्षण, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्कार यांचे महत्त्व ओळखून भविष्यासाठी भक्कम पाया घालावा, असा संदेश पोटे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

### संघर्षातून घडलेला यशस्वी प्रवास

यावेळी सुनिल पोटे यांनी आपल्या जीवनातील संघर्ष विद्यार्थ्यांसमोर उलगडला. माझे प्राथमिक शिक्षण गावात झाले. उच्च शिक्षणासाठी पुण्यात गेल्यानंतर चुकीच्या संगतीमुळे दोन वर्षे वाया गेली. मात्र शिक्षणावरील निष्ठा, ध्येयाप्रती असलेली जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मी चुकीची वाट सोडून पुन्हा शिक्षणाचा मार्ग स्वीकारला. त्यानंतर शिक्षण क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली आणि आज मुख्याधिकारी पदापर्यंतचा प्रवास पूर्ण करता आला, असे त्यांनी सांगितले.

### १५ हजार रुपयांच्या वह्यांची भेट

कार्यक्रमात मुंबई येथील डॉ. नानाभाऊ खणकर यांनी विद्यार्थ्यांना १५ हजार रुपयांच्या वह्यांचे वाटप केले. तसेच जाधव आणि नवले यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.

### स्कूल समिती सदस्यांचा गौरव

आपलं गाव फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सुरेश खणकर यांनी प्रास्ताविकातून व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. रयत शिक्षण संस्थेने डॉ. सुरेश खणकर, राजेंद्र खणकर आणि विजय गुंजाळ यांची स्थानिक स्कूल समिती सदस्यपदी निवड केल्याबद्दल केदारेश्वर विद्यालय व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक नवले, मंडले, कैलास खोडदे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक भिकाजी जगदाळे आणि शिक्षक संतोष वरखडे यांच्या हस्ते हा सत्कार पार पडला. कार्यक्रमास राजेंद्र खणकर, कारखिले, जगदाळे , ढुबे, जगदाळे, नरसाळे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com